# मेट्रो स्लीपरसाठी स्विस तंत्रज्ञान

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

## कंपन नियंत्रणासाठी खास मशिनचा वापर

मुंबईकरांचा भुयारी मेट्रो (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रवासाचा पहिलावहिला अनुभव अधिक सुखकर व्हावा यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे स्विस कंपनी 'सोनविले'ने निर्मिती केलेल्या मशिनच्या सहाय्याने स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. ट्रॅकची ही यंत्रणा अद्ययावत असून, स्लीपर बॉक्सची निर्मिती वडाळा येथे सुरू आहे. अशा प्रकारचे आणखी एक मशिन लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती एमएमआरसीने दिली.

मुंबईतील पहिल्या भूयारी मेट्रोचे काम प्रगतिपथावर आहे. जागतिक कीर्तीच्या अनेक अद्ययावत यंत्रणा, तंत्रज्ञान या प्रकल्पासाठी वापरण्यात येत आहेत. सर्वसाधारण मेट्रो रुळांची कंपन सहन करण्याची क्षमता २२ व्हीडीबी असते. मात्र, या स्लीपर बॉक्समुळे रुळांची कंपन शोषण क्षमता वाढणार आहे.



संवेदनशील इमारती, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, चित्रीकरण स्टुडिओ तसेच पुरातन इमारती आणि दाटीवाटीची वस्ती असल्याने या मार्गांसाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे. मेट्रो ३ प्रकल्पासाठी २ लाख १ हजार ६०० इतके स्लीपर ब्लॉक्स लागणार असून, अशा प्रकारच्या दोन मशिन दरमहा १२ हजार स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती करतील. 'कंपनांची परिणामकारकता कमी करण्यासाठी आणि प्रवाशांच्या आरामदायी प्रवासासाठी ही पद्धत सर्वोत्तम आहे. आवश्यकतेनुसार योग्य वेळेत स्लीपर बॉक्सची निर्मिती करण्यासाठी ही एकूण प्रक्रिया सोनविले कंपनीच्या स्विस तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पार पडत आहे', असे एमएमआरसीचे प्रकल्प संचालक एस के गुप्ता यांनी सांगितले.